## प्रकरण दुसरे

## विसाव्या शतकातील औंधचे राज्यकर्ते

सन १८२० मध्ये इंग्रज राज्यकर्त्यांनी पंतप्रतिनिधींशी स्वतंत्र तह करून त्यांना साताऱ्च्या छत्रपतींच्या दिमतीस दिले. या तहामुळे प्रतिनिधी आपले अस्तित्व राखू शकले, तसेच ते साताऱ्च्या छत्रपतींचे जहागिरदार बनले. तथापि १८४९ साली इंग्रज राज्यकर्त्यांनी साताऱ्चे राज्य खालसा केले. परंतु प्रतिनिधी घराण्याकडे त्यांची वडिलोपार्जित जहागिर तशीच ठेवण्यात आली. इंग्रज अंमलात प्रतिनिधींच्या त्या जहागिरीचा उल्लेख तिच्या मुख्य ठाण्याच्या नावावरून औंध संस्थान असा होऊ लागला. हे संस्थान तत्कालीन भारतीय संस्थानांच्याप्रमाणे ब्रिटिश अधिसत्तेच्या अंकीत होते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी परशुराम श्रीनिवास उर्फ दादासाहेब हे श्रीनिवासरावांचे ज्येष्ठ चिरंजीव औंधचे राज्यकर्ते होते. परंतु त्यांची कारकिर्द अल्पजीवी ठरली. ते इ.स. १९०२ ते १९०५ या काळात म्हणजे जेमतेम तीन वर्षे सत्तेवर राहिले. त्यानंतर दादासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव गोपाळकृष्ण उर्फ नानासाहेब हे प्रतिनिधीपदावर आले. परंतु त्यांचीही कारकिर्द अल्प अशीच ठरली. ते इ.स. १९०५ ते १९०७ एवढाच काळ प्रतिनिधीपदवार होते. संस्थानचे तत्कालीन कारभारी जेकब बापूजी यांच्या खुनाचा कट केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवून इंग्रज सरकारने त्यांना पदच्युत केले. त्यानंतर इ.स. १९०७ ते १९०९ या दोन वर्षांच्या काळात इंग्रज सरकारने संस्थानचा सर्व कारभार आपल्या हाती ठेवला. नंतर मात्र प्रतिनिधीपदास योग्य, लायक व्यक्ती म्हणून प्रतिनिधींच्या वारसापैकी श्रीनिवासरावांचे तिसरे पुत्र भवानराव श्रीनिवासराव उर्फ बाळासाहेब यांना ब्रिटिश सरकारने ४ नोव्हेंबर १९०९ रोजी प्रतिनिधीपदाची वस्त्रे व अधिकार दिले. विसाव्या शतकात औंध संस्थानला जे जे राज्यकर्ते लाभले त्या सर्वांत बाळासाहेब पंतप्रतिनिधी हेच सर्वांत यशस्वी ठरले. दीर्घकाल यशस्वी राज्य करणारा, लोकप्रिय, ' आदर्श राजा ' म्हणून बाळासाहेब पंतप्रतिनिधीचा उल्लेख करावा लागतो.

विसाव्या शतकातील औंध संस्थानचे उल्लेखनीय राज्यकर्ते श्री भगवानराव श्रीनिवास उर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी हेच होते. या प्रजाहितदक्ष, विद्वान व लोकप्रिय अधिपतींचा जन्म राजर्षि श्रीनिवास परशुराम व सगुणाबाई यांच्या पोटी कार्तिक शुध्द नवमी, शनिवार, शके १७९०, विभवनाम संवत्सरे, सन १७६८ आक्टोबर, तारीख २४ श्रवण नक्षत्र, चवथा चरण, रात्रौ सुमारे साडे नऊ वाजता सातारा येथे मुक्काम असताना झाला.[१]

बाळासाहेबांना राजपद मिळण्याचा संभव नव्हता. परंतु राजकुमार म्हणून बालपणापासूनच त्यांचे आयुष्य श्रीमंतीत गेलेले होते. त्यामुळे त्यांना काही वाईट सवयी लागणे स्वाभाविक होते. परंतु सुदैवाने श्रीमंतीतल्या दुर्गुणांचा त्यांना स्पर्शही झाला नाही. उलट त्यांनी प्रथमपासूनच आपली दृष्टी सर्वसामान्य संस्थानिकांच्या मुलाप्रमाणे संकुचित व स्वार्थी न ठेवता व्यापक ठेवली. त्यांनी स्वत:ला विद्या व्यासंग आणि विद्वान मंडळींच्या सहवासाची आवड सुरुवातीपासूनच लावून घेतली. विद्याव्यासंग, उद्योगप्रियता, शुध्द चारित्र्य, साधेपणा इत्यादी गुण बाळासाहेबांच्या ठिकाणी प्रारंभी पासूनच होते. विशेष म्हणजे त्यांना पुढे राजपद प्राप्त झाल्यानंतरही हे गुण त्यांच्या ठिकाणी कायम राहिले. उलट त्यामध्ये वाढ होत गेलेली दिसून येते. आणि हेच बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे वैशिष्ट्य होय.

भवानराव श्रीनिवास उर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे मुंबई विद्यापीठाचे पदवीधर होते. वर सांगितल्याप्रमाणे त्यांना सुरुवातीस राजपद मिळण्याची कसल्याही प्रकारची शक्यता नव्हती. परंतु योगायोग म्हणूनच त्यांना राजपद मिळाले. या संदर्भात असेही म्हटले जाते की बाळासाहेबांनी औंध संस्थानचे राजपद अन्यायाने मिळविले. वास्तविक नानासाहेब पदच्युत झाल्यानंतर प्रतिनिधीपद त्यांचे धाकटे बंधु भाऊसाहेब यांना मिळावयास हवे होते. परंतु तसे न होता ते बाळासाहेबांना मिळाले. याबद्दल काहीजण

बाळासाहेबांना दोषी ठरवितात. परंतु त्यावेळच्या परिस्थितीचा विचार करता ते योग्य वाटत नाही. नानासाहेबांच्या पदच्युती नंतर इंग्रज सरकारला प्रतिनिधीपदासाठी योग्य, लायक व्यक्ती हवी होती. बाळासाहेब सुशिक्षित सुसंस्कृत होते. त्यामुळे इंग्रज सरकारने प्रतिनिधीपदास बाळासाहेब हेच योग्य समजून त्यांची निवड केली असावी असे वाटते.

असे असले तरी गादीचा, सत्तेचा मोह बाळासाहेबांना नव्हता असे मात्र म्हणता येत नाही. बाळासाहेब हे सुशिक्षित विद्याभूषित असले तरी राजपद आपणास मिळावे अशी त्यांची आकांक्षा सुरुवातीपासूनच होती असे दिसते. बाळासाहेबांनी स्वत: आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे, " आमची जन्म कुंडली साधारणच आहे. स्थित्यंतर होईपर्यंन्त कोणत्याही ज्योतिषाने अशाप्रकारचा राजयोग आहे हे सांगितले नव्हते. एवढेच नव्हे तर आम्हास राजयोग आहे का ? म्हणून विचारले तर " हे तुम्हास कुठला राजयोग ? " म्हणून म्हणत असत .... चार-पाच लोकांनी आमच्या कुंडल्या मांडल्या ग्रह वर्तविले. पत्रिका लिहल्या. मेंडोळीच्या मेंडोळी तयार झाली. पण एकानेही या दोहोंपैकी (राजयोग व तीन पत्नी) एकाही गोष्टीचा नामनिर्देश केला नाही. एवढेच नव्हे तर कित्येकास प्रत्यक्ष विचारले. असतानाही त्याने सांगितले नाही.....यापैकी मृगसंहितेतून हैद्राबादेहून (दक्षिण) पत्रिका आणविली त्यात मात्र अमुक एक प्रायश्चित केले तर राजयोग मिळेल असे लिहले होते. त्याप्रमाणे आम्ही प्रायश्चित्तही केले होते....."[२] यावरून बाळासाहेबांना सुरुवातीपासूनच राजपदाची अपेक्षा, आसक्ती होती हे स्पष्ट होते. त्यामुळे राजपदाच्या प्राप्तीसाठी त्यांनी कारभारी नेकब बापूजी यांना हाताशी धरून, इतर इंग्रज अधिकाऱ्यांना वश करून घेऊन नानासाहेबांना पदच्युत करवून स्वत:ला गादी मिळविली नसेल असेही ठामपणे म्हणता येत नाही.

## बॉब स्फोटाचे अरिष्ट :

परिणामत: बाळासाहेबांनी अन्यायाने गादी मिळविली असा पदच्युत नानासाहेबांच्या बाजूच्या लोकांचा ग्रह होऊन त्यांनी सूड घेण्याच्या हेतूने बाळासाहेबांच्या विरुध्द कट केला. या कटात औंध येथील श्री महादेव रामचंद्र हिंगे व श्री नारायण पांडुरंग मेहदळे हे दोन शिक्षक व सातारा येथील काही विद्यार्थी सामील होते. त्यांनी जेकब बापूजी व बाळासाहेबांच्यावर टाकण्यासाठी बॉंब सुध्दा तयार केला होता. परंतु ही गुप्त गोष्ट श्रीमंत भाऊसाहेब यांच्यामुळे उघडकीस आली. श्रीमंत भाऊसाहेब त्यावेळी पुण्यास न्यू ईंग्लिश स्कूलच्या बोर्डिंगमध्ये शिकत होते. श्री. हिंगे यांनी ज्यावेळी आपण बॉंब तयार केल्याची बातमी भाऊसाहेबांना पत्राने कळविली तेव्हा भाऊसाहेबांनी ते पत्र बोर्डिंगचे सुपरिटेंडेंट यांना दिले. सुपरिटेंडेंटने पोलिस खात्याला कळविले. श्री. हिंग्यांच्या खोलीची झडती घेण्यात आली. तेंव्हा तो बॉंब हिंगे यांच्या टेबलमध्ये सापडला. त्यानंतर हिंग्यांच्या मित्रांची वगैरे झडती घेण्यात आली. हे प्रकरण ' औंध बॉंब खटला ' व पुढे ' सातारा येथील कटाचा खटला ' म्हणून गाजले. त्यात अनेकांना जबर शिक्षाही झाल्या. अशाप्रकारे बाळासाहेबांच्या वरील एक संकट अकल्पितपणे टळले.[3]

परंतु वरील घटनेचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास केल्यास आपणास असे दिसून येते की त्यामध्ये सत्यापेक्षा असत्याचाच भाग अधिक आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे बाळासाहेबांनी अन्यायाने गादी मिळविली होती आणि त्याचा सूड घेण्यासाठी त्यांच्या विरोधकांनी कट रचला होता, असे गृहित धरले तरी अन्याय भाऊसाहेबांच्यावर झालेला होता हे नजरेआड करता येत नाही. त्यामुळे या कटाचे सूत्रधार भाऊसाहेबच असावयास हवे होते. भाऊसाहेब जर कटाचे प्रमुख असते तर श्री. हिंगे यांनी त्यांना पत्र पाठवून बॉंब तयार केल्याची बातमी कळविली असता त्यांनी ते पत्र सुपरिटेंडेंटला का दाखविले ? असा प्रश्न

आपणापुढे उभा राहतो. याचाच अर्थ तो बाँब संस्थानाधिपती विरुध्द नव्हे तर इंग्रज अधिकाऱ्यांच्या विरुध्द वापरण्यासाठी क्रांतिकारकांनी तयार केला असावा असे वाटते. सातारा कटाच्या खटल्यातील प्रमुख आरोपी श्री.वा.वि. आठल्ये यांचे स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर आदी क्रान्तीकारकांच्या गुप्त संघटनेशी लागे बंदे होते. याचा अर्थ बाळासाहेबांच्या विरुध्द संस्थानात कोणत्याही प्रकारचा कट रचला गेला नव्हता. श्री. हिंगे प्रभृतींनी तयार केलेला बाँब जेकब बापूजी किंवा बाळासाहेब यांच्यावर टाकण्यासाठी होता असे म्हणावयास जागा राहत नाही.

वरील बाँब प्रकरणाच्या संदर्भात हिंग्यांचे अत्यंत जवळचे मित्र डॉ.वा.वि. आठल्ये यांनी आपल्या आत्मचरित्रामध्ये स्पष्ट खुलासा केला आहे. ते म्हणतात, "..... हिंग्यांनी बाळासाहेबांच्या विरुध्द कट केला होता हे विधान सर्वस्वी खोटे आहे.....आमचा कट होता. आमचे गुप्त मंडळ होते व आम्ही बाँबही तयार केला होता. पण त्याचा संबंध बाळासाहेब किंवा जेकब बापूजी यांच्या खऱ्या अथवा खोटया कारस्थानाशी यत्किंचितही नव्हता. आमच्या मंडळाचे ध्येय ब्रिटिशांच्या जोखडातून हिंदुस्थानास स्वतंत्र करण्याचे होते. आमच्या मंडळाच्या चार वर्षांच्या दीर्घ आयुष्यात एकाही सभेत अथवा चर्चेत बाळासाहेब अथवा जेकब बापूजी हे आमच्या चर्चेचे विषय झाले नव्हते. हे मी त्या मंडळाच्या आद्य संस्थापकांपैकी एक या नात्याने जाहीर करतो.....ब्रिटिशांच्या विरुध्द असतील त्या सर्व शक्ती आम्ही एकत्र करीत होतो आणि तेवढ्याच भूमिकेतून भाऊसाहेब पंतास आमच्या मंडळात प्रवेश मिळाला होता. स्वत: भाऊसाहेबांनेही कधी आमच्या मंडळास बाळासाहेब किंवा जेकब बापूजी यांच्या विरुध्द उठाव करण्यास विनंती केली नाही. बाळासाहेब किंवा जेकब बापूजीवर आमच्या मंडळाकडून कसलेही अरिष्ट आलेले नव्हते.....हिंग्यांनी तयार केलेला बाँब.....या बाँबच्या प्रयोग जेव्हा एका मोठया शिळेवर केला तेव्हा त्या शिळेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या होत्या.

या यशाने बेभान होऊन हिर्‍यांनी ही खबर भाऊसाहेबांना सांगितली व भाऊसाहेबांनी भितीपोटी ती सुपरिटेंडेंटला सांगून मंडळाचा विश्वासघात केला....[४]

डॉ. आठल्ये यांच्या वरील स्पष्टीकरणावरुन बाळासाहेब व जेकब बापूजी यांच्या विरुध्द संस्थानमध्ये कट रचला गेला होता व बाळासाहेबांवरील ते अरिष्ट अकल्पितपणे टळले या विधानातील फोलपणा स्पष्ट होतो.

व्यक्तिमत्व :

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचे व्यक्तिमत्व फार प्रभावी होते. उंच आणि धिप्पाड शरीरयष्टी, निमगोरा वर्ण, पाणीदार डोळे, विस्तृत व भव्य कपाळ आणि त्यावर लावलेले त्रिरेघी केशरी गंध, मस्तकी मराठेशाही पागोटे, अंगात अंगरखा व त्यावर टाकलेले उपरणे, पायात पायजमा आणि जोडा व हातात काठी व हा त्यांचा सुंदर ऐटबाज रुबाब पाहिला की पाहणाऱ्याच्या मनात त्यांच्याविषयी एकदम भितीयुक्त आदर उत्पन्न होत असे.

बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे सुशिक्षित विद्वान, मातृभक्त, ग्रंथप्रेमी, कलाप्रेमी, उत्कृष्ट चित्रकार, प्रभावी किर्तनकार, स्वदेशीचे निस्सीम उपासक, सूर्यनमस्काराचे आद्य पुरस्कर्ते, शिक्षण प्रसाराचे, औद्योगिक विकासाचे चाहते, उद्योगप्रिय, दीर्घोद्योगी आदर्श राजा म्हणून सर्वांना परिचित होते.[५]

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांना राजपद मिळाल्यानंतर औंध संस्थानचा भाग्योदय झाला. त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये औंध संस्थानची सर्वांगीण प्रगती साधली. तथापि त्यांना प्रसिध्दी मिळाली ती दोन कारणामुळे एक म्हणजे त्यांनी सूर्यनमस्काराची चळवळ उभारली. दुसरी गोष्ट अशी की त्यांनी आपल्या

छोटयाशा संस्थानात `ग्रामराज्याचा प्रयोग` (गांधीवादी राज्यघटना) यशस्वीरित्या राबविला. यापैकी ग्रामराज्याच्या प्रयोगाबद्दल आपण पुढे स्वतंत्र प्रकरणात चर्चा करणार असल्यामुळे त्याची या ठिकाणी वेगळी चर्चा करण्याची गरज नाही. मात्र सूर्यनमस्काराच्या प्रसारासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा येथे आढावा घेणे आवश्यक ठरते.

सूर्यनमस्कार प्रचार :

सूर्यनमस्कार हा व्यायामाचा एक प्रकार होय. पूर्वीच्या काळात राजे लोकांना व्यायामाचा शौक असे. त्याकरिता पदरी पैलवान, कसरतपटू वगैरे बाळगण्याची पध्दत होती. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांना सूर्यनमस्कार घालण्याचा छंद होता. मिरज संस्थानचे वृध्द, समकालीन राजे श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांच्या सांगण्यावरुन बाळासाहेबांनी वयाची पंचेचाळीस वर्षे उलटल्यानंतर सूर्यनमस्कार घालण्यास सुरुवात केली. तेंव्हापासून शेवटपर्यन्त त्यांचा हा क्रम अव्याहतपणे सुरु होता. ते रोज तीनशे नमस्कार घालीत असत व यासाठी त्यांना दोन तास लागत असत. रोज पहाटे तीन वाजता उठून स्नानसंध्या आटोपल्यानंतर मोठयाने मंत्र म्हणत. जोरदार प्राणायामाबरोबर ते शास्त्रोक्त नमस्कार घालीत असत. सूर्यनमस्काराचे बाळासाहेबांना इतके वेड होते की त्यांच्या या वेडेपणाचा छंदिष्टपणाचा लोक गैरउपयोग बढती व बदली करुन घेण्याकरिता करुन घेत. या संदर्भात उदाहरणच द्यावयाचे झाल्यास औंध येथील एका शाळा मास्तरांचे देता येईल. औंधात एक शाळा मास्तर होते आणि ज्यावेळी राजांची गाडी सकाळी सहाच्या सुमारास यमाईच्या डोंगराकडे (मूळपीठ) जात असे त्यावेळी त्याच रस्त्याला लागून असलेल्या छात्रालयाच्या आपल्या खोलीतच हे मास्तर चक्क अंथरुणावर झोपूनच मोठयाने `ओम-ह्राम-मित्राय-नम:` वगैरे सूर्यमंत्र म्हणावयाचे. उद्देश हा की आपण नित्यनियमाने सूर्यनमस्कार घालतो हे बाळासाहेबांच्या लक्षात यावे. परंतु एके दिवशी हा प्रकार चालू असतानाच मुलांनी मास्तरांच्या खोलीचे दार उघडल्यामुळे त्यांचे रहस्य उघडे पडले.

सांगण्याचे तात्पर्य म्हणजे बाळासाहेबांचा छंदिष्टपणा लोकांना माहित होता. त्यामुळे रोज सूर्यनमस्कार घालतो, फार उपयोग झाला, असे राजाला सांगून लोक बढती, बदली करून घेत असत. इतके बाळासाहेब सूर्यनमस्काराच्या आहारी गेलेले होते.[६]

बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी औंध संस्थानातील सर्व शाळांमधून सूर्यनमस्काराचा व्यायाम सक्तीचा केलेला होता. मुलांबरोबर मुलींनाही हा व्यायाम सक्तीचा होता. या बाबतीत बाळासाहेबांचे ' शरीर-शील-विद्या ' असे सूत्र होते. म्हणजे प्रत्येक व्यक्तीने प्रथम आपले आरोग्य सांभाळावे, मग शील सांभाळावे आणि शेवटी विद्या संपादन करावी. त्यांनी स्वत: आपल्या मुलामुलींना शास्त्रोक्त सूर्यनमस्कार घालण्याचे शिक्षण दिलेले होते. बाळासाहेब वरचेवर तालुक्याच्या ठिकाणी जमाबंदीसाठी जात असत, त्यावेळी तेथील शाळेतील मुलांचे सूर्यनमस्कार तपासत, योग्य ते मार्गदर्शन करीत, सूचना देत. खुद्द औंध मध्ये श्री यमाई देवीच्या मंडपात बाळासाहेब आपल्या स्वत:च्या देखरेखीखाली मुलांच्याकडून हा व्यायाम करवून घेत असत.[७]

बाळासाहेब पंतप्रतिनिधींना सूर्यनमस्कार व्यायामाने इतके झपाटलेले होते की, या व्यायामाच्या प्रसारासाठी त्यांनी प्रचारक नेमले होते. संस्थानातील आटपाडी, कुंडल अशा ठिकाणी बाळासाहेबांनी स्वतंत्र सूर्योपासना मंदिरे उभारली होती. शास्त्रोक्त पध्दतीने घालावयाच्या सूर्यनमस्काराच्या त्यांनी फिल्मस् तयार केल्या होत्या. या विषयावर बाळासाहेबांनी ' सूर्य नमस्कार ' वगैरे सारखी मराठी, इंग्रजी भाषेतून पुस्तकेही लिहून प्रसिध्द केलेली होती. याद्वारे त्यांनी स्वदेशांत या व्यायाम प्रकाराचा प्रसार केला. परंतु इंग्लंडसारख्या प्रगत देशात देखील बाळासाहेबांनी शाळा खात्याच्या सहाय्याने व्याख्यान दौरे काढले, मुलाखती दिल्या, मते मांडली, प्रदर्शने भरविली व पुस्तके छापून त्याद्वारे फ्रान्स, इटली, जर्मनी, डेन्मार्क, इजिप्त, कॅनडा,

ऑस्ट्रिया या दूरच्या देशातही सूर्यनमस्कार व्यायामाचा प्र ार केला. यावरून बाळासाहेबांच्या चिकाटीची आपणास कल्पना येऊ शकते.

पुरंतु अशाप्रकारे संस्थानातील सर्व स्त्री-पुरूषांवर या व्यायानाची सक्ती करणे हा केवळ बाळासाहेबांच्या लहरीपणाचा भाग होता. या त्यांच्या लहरीपणाबद्दल इ.स. १९३५ मध्ये इंग्लंड मधील ` सन्डे रेफरी ` (
) या वृत्तपत्राने बाळासाहेबांच्यावर अगदीच टोकाची टीका केली. त्यातील काही मजकूर खालीलप्रमाणे :

` हिंदुस्थानात अनेक व्यसनी व आचरट राजे आहेत. यापैकी एक वयस्कर राजा आताच लंडनमध्ये आहे. त्याला विशिष्ट व्यायामाचे वेड आहे. त्याने हा व्यायाम आपल्या संस्थानात सर्वांनी घालण्याचा दंडक काढला आहे. हा दंडक विशेषत: तरूण मुलींना लागू आहे. या व्यायानामुळे या मुली सडपातळ व सुंदर दिसू लागल्या की तो त्यांना लगेच आपल्या जनानखान्यात घालतो. ` या टीकेतील अश्लील भाग चुकीचा होता. त्याबद्दल नंतर ` सन्डे रेफरी ` ने माफी मागून चारित्र्याबद्दल शंका घेतल्याची भरपाई म्हणून दोन हजार पौंड (तीस हजार रूपये) कोर्टात दंड भरला. परंतु यावरून बाळासाहेबांचे सूर्यनमस्काराचे वेड किती पुढे गेले होते याची कल्पना येते. आचार्य अत्रेंनी देखील बाळासाहेबांच्या या ध्येयदिष्टपणावर बोट ठेवण्यासाठी ` साष्टांग नमस्कार ` नावाचे नाटक लिहिले आहे.[८] तात्पर्य, बाळासाहेबांच्या या ध्येयदिष्टपणाबद्दल सर्वांचेच चांगले मत होते असे नाही.

असे असले तरी हा बाळासाहेबांचा फक्त लहरीपणा होता असे म्हणता येत नाही. कारण बाळासाहेबांनी वयाच्या पंचेचाळीस वर्षांनंतर सूर्यनमस्कार घालावयास सुरूवात केलेली होती आणि त्यांना त्याचे चांगले अनुभव आलेले होते. या व्यायाम पद्धतीचे महत्त्व त्यांना स्वत:च्या अनुभवाने

पटलेले होते. सर्वसामान्य स्त्री-पुरुषांच्या आटोक्यात असणारा, सर्व शरीराला सारखा व्यायाम देणारा, कोठेही करता येण्यासारखा व साधन-रहित, बिनखर्ची असा नमस्कारासारखा दुसरा व्यायाम प्रकार नाही. हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर आपल्या प्रमाणेच अखिल मानव जातीचे आरोग्य, आयुष्य-मान व कार्यक्षमता वाढावी या हेतूने त्यांनी हा व्यायाम संस्थानात सर्वांसाठी सक्तीचा केला होता. एवढेच नव्हे तर आपल्या अनुभवाचा फायदा जगातील मानवजातीस व्हावा यासाठी त्यांनी शास्त्रोक्त सूर्यनमस्कार कसे घालावेत यासंबंधी पुस्तके लिहून त्याचा परदेशातही प्रसार केला. इंग्लंडमधील ' न्यूज क्रॉनिकल ' या दैनिकाने सूर्यनमस्कारावर त्यांचे सहा लेख प्रसिध्द केले होते. या लेखांचेच रूपांतर श्रीमती लुईस मॉरगन हिने १९३७ मध्ये करून ' टेन पॉईन्ट वे टू हेल्थ ' (पूर्ण आरोग्यासाठी दहा आसने) हे पुस्तक प्रसिध्द केले. त्या पुस्तकास त्यावेळी मोठया प्रमाणावर मागणी होती. यावरून सूर्यनमस्कार हा केवळ बाळासाहेबांचा लहरीपणा होता असे म्हणणे कसे गैर आहे ते स्पष्ट होईल.[१]

## सामाजिक सुधारणा :

बाळासाहेब पंतप्रतिनिधींना आपल्या प्रजेबद्दल अत्यंत कळकळ होती. संस्थानातील प्रजा सुखी तर आपण सुखी अशी त्यांची विचारसरणी असल्यामुळे संस्थानातील समाजजीवन स्थिर होऊन संपूर्ण समाज सुखी व्हावा यासाठी त्यांनी आपल्या कारकिर्दीत अव्याहत प्रयत्न केलेले दिसून येतात.

शेतकऱ्यांच्या हिताविषयी तर त्यांना फार तळमळ होती. शेतकरी सुखी तर सर्व संस्थान सुखी, हे त्यांच्या कारभार विषयक धोरणाचे सूत्र होते. शेतकऱ्यांजवळ शेतसारा भरण्यास पैसा नसेल तर त्याने त्याऐवजी तेवढया किंमतीचे हाताने काढलेले सूत द्यावे. म्हणजेच शेतसारा सूताच्या रूपाने भरावा अशी सवलत बाळासाहेबांनी शेतकऱ्यांना दिलेली होती. ही एकच

गोष्ट त्यांना शैतक-यांविषयी अंत:करणापासून असलेली तळमळ सिध्द करण्यास पुरेशी आहे.[१०]

सामाजिक बाबतीत बाळासाहेबांचे विचार उदार होते. आपल्या समाजामध्ये जातिभेद आहेत. त्यामुळे समाज एकसंध होऊ शकत नाही हे ओळखण्याचा सूज्ञपणा त्यांच्या ठिकाणी होता. समाजातील हा स्पृशास्पृशतेचा भेद नष्ट करून समाजाला एकसंध स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आपल्या संस्थानातील सर्व अस्पृश्य बांधवांना एकत्र बोलावून त्यांना काही निर्बन्ध पाळण्याचे बाळासाहेबांनी आवाहन केले. ते निर्बन्ध म्हणजे - (१) मेलेल्या जनावरांचे मांस खाण्याचे सोडून द्यावे. (२) दररोज स्नान करून स्वच्छतेने वागा. (३) उष्टे खाऊ नका, इत्यादी. अशाप्रकारचे सहज शक्य असणारे निर्बन्ध त्यांना मान्य करावयास लावले. या सहज शक्य असणा-या गोष्टींचे अस्पृश्यांनी पालन केले तर त्यांची अस्पृश्य म्हणून कुणी हेटाळणी करणार नाही याची बाळासाहेब पंतप्रतिनिधींना खात्री होती. पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनी तर अस्पृश्यांच्या वस्तीतून प्रभातफे-या काढण्यास, साबणासारख्या नित्योपयोगी वस्तू फुकट देण्यास सुरूवात केली होती. अस्पृश्यांच्या वस्तीमध्ये कथा-भजन वगैरे सारखे धार्मिक, प्रबोधनात्मक कार्यक्रम करण्यास सुरूवात केलेली होती.

अस्पृश्यां बरोबर इतरांनाही स्वच्छतेची आवड निर्माण व्हावी यासाठी बाळासाहेबांनी सन १९३२ पासून संस्थानात ' आरोग्य दिन ' साजरा करण्याची पध्दत सुरू केली. ज्यांची घरे स्वच्छ असतील त्यांना बक्षिसे देण्याची प्रथा सुरू केली. महत्वाची गोष्ट म्हणजे आरोग्य दिनाच्यावेळी स्वत: महाराज व राणीसाहेब अस्पृश्यांच्या वस्तीत शिरून पाहणी करत. राणीसाहेब स्वत: अस्पृश्य स्त्रियांना कुंकू लावीत व त्यांच्या कडूनही लावून घेत. एवढेच नव्हे तर

मकर संक्रांतीच्या वेळेस अस्पृश्य स्त्रियांना सौ. राणीसाहेब राजवाड्यात बोलावून घेत व त्यांना चांदीचे करंडे व संक्रांत ओसा देत असत. खुद्द राणीसाहेबांच्या स्वयंपाकघरात काम करणारी स्त्रीही अस्पृश्य होती."[११]

बाळासाहेबांनी अस्पृश्यता निवारणाच्या मोहिमेची स्वत:पासूनच सुरुवात केली. खुद्द त्यांच्याच घरात पोटजातीय व पुनर्विवाहित संततीशी विवाह झालेले होते.[१२] बाळासाहेबांची मुले-मुली अस्पृश्यांच्या लग्नसमारंभात सामील होत असत. बाळासाहेब स्वत: पंक्तिभेद मानीत नव्हते. अशाप्रकारे बाळासाहेबच अस्पृश्योध्दारासाठी कृतीशील असल्यामुळे सर्व संस्थानात अस्पृश्योध्दाराची मोहीम सुरू झाली. औंध संस्थानातील शाळा, हायस्कूल्स, मंदिरे, सार्वजनिक सभा, सरकारी कचेऱ्या, दरबार अस्पृश्यांना खुला होता. अशात-हेने बाळासाहेबांनी शाळेत, मंदिरात, सभेत, कारखान्यात, खुद्द राजवाड्यात आणि राज्यात अस्पृश्यता नष्ट केली होती. यावरून आपणास त्यांच्या पुरोगामी धोरणाची कल्पना येऊ शकते.

<u>धार्मिक सुधारणा</u> :

बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे स्वत: हिंदुधर्माचे अभिमानी होते. धार्मिक आचार, विचार याबाबतीत ते नेहमीच दक्ष असत. औंध गावाचे नैऋत्य दिशेस असलेल्या टेकडीवर जगदंबा देवीचे स्वयंभू स्थान आहे. ही जगदंबा प्रतिनिधी घराण्याची कुलस्वामिनी. वंशपरंपरेने या देवीची भक्ती प्रतिनिधी घराण्यामध्ये चालत आलेली होती. बाळासाहेब पंतप्रतिनिधीही श्री जगदंबेचे परमभक्त होते. त्याचप्रमाणे संस्थानात इतरही देवदेवतांची पूजा-अर्चा, नैवेद्य, वार्षिक उत्सव वगैरे व्यवस्थित पार पाडता यावेत यासाठी बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी देवस्थानचे नावे बँकेत ठेव ठेवली होती व ठेवीच्या व्याजातून पूजा-अर्चेची व्यवस्था कायम उत्तम राहील अशी तरतूद केलेली होती.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सन १९१८ मध्ये बाळासाहेबांनी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांना आर्थिक सहाय्य व प्रोत्साहन देऊन ' स्वाध्याय मंडळ, औंध ' या स्वतंत्र संस्थेची स्थापना केली. ही संस्था स्थापन करण्या पाठीमागे श्रीमंत बाळासाहेबांचा महत्वाचा उद्देश असा होता की वेद, उपनिषदे, धर्मसूत्रे व पुराणे या हिंदूंच्या प्राचीन धर्मग्रंथातील ज्ञान सर्वसामान्य लोकांना साध्या-सोप्या भाषेतून उपलब्ध व्हावे व ते त्यांना समजावे. या स्वाध्याय मंडळाने अनेक धर्मग्रंथांचे सार सुटसुटीत भाषेत पुस्तके छापून सर्वसामान्यापर्यन्त पोहचविण्याचे कार्य केले. स्वाध्याय मंडळाचे नाव सर्व हिंदुस्थानातील लोकांना माहित होतेच. परंतु आफ्रिका, ब्रम्हदेश, सिलोन वगैरे दूरच्या देशांतील वाचकांसही ते माहित झालेले होते. यावरून या मंडळाची कार्यक्षमता आपणास समजू शकते.[१३]

बाळासाहेब हे स्वत: दैववादी, परंपरावादी कर्मठ असले तरी ते अंधश्रध्दाळू नव्हते. संस्थानात धर्माच्या नावाखाली मोंदूगिरी व पिळवणूक करणारे संत, महंत, तांत्रिक, मांत्रिक यांना त्यांनी कधीच आश्रय दिलेला नव्हता. बाळासाहेब परंपरावादी, कर्मठ असले तरी नवे विचार आकलन करण्याची शक्ती व इच्छा त्यांच्यामध्ये होती. जुने पुष्कळ आचार, नित्यकर्म, श्राध्दपक्ष, उपासना वगैरे ते कटाक्षाने पाळीत असले तरी नव्या गोष्टी आत्मसात करून पचविण्याची त्यांची क्षमता व तयारी होती.

## शैक्षणिक प्रगती :

बाळासाहेब पंतप्रतिनिधी स्वत: विद्याविभूषीत होते. समाजाची सर्वांगिण प्रगती करणे हे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे याची जाणीव बाळासाहेबांना होती. सन १८९८ मध्ये वडिलांच्या कारकिर्दिमध्ये त्यांची संस्थानचे चीफ सेक्रेटरी म्हणून नेमणूक झालेली होती. त्यावेळी बाळासाहेबांनी संस्थानातील शिक्षणाचा दर्जा कसा वाढेल, शिक्षण

समाजातील खालच्या थरापर्यन्त कसे पोहोचवता येईल याची प्रामुख्याने दक्षता घेतलेली दिसून येते. यासाठी संस्थानातील गरीब, हुशार, होतकरू मुलांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. गरीब विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची सोय व्हावी यासाठी औंधास बोर्डिंगची स्थापना केलेली होती. इंग्रजी शिक्षणासाठी संस्थानातील मुलांना बाहेरगावी जावे लागत होते आणि बाहेर जाऊन शिक्षण घेणे सामान्य, गरीब विद्यार्थ्यांना शक्य नव्हते. यासाठी इ.स. १८९८ मध्येच त्यांनी औंध येथेच हायस्कूल काढून इंग्रजी शिक्षणाची सोय केली. सन १८६५ मध्येच औंध संस्थानामध्ये प्राथमिक शाळांची स्थापना झालेली होती. परंतु बाळासाहेबांना राजपद मिळाल्यानंतर औंध संस्थानने शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने प्रगती केलेली दिसून येते.[१४]

इ.स. १९१६ मध्ये बाळासाहेबांनी संस्थानात सर्वत्र प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. सक्तीच्या शिक्षणाबद्दल लोकांचे मत काय आहे हे जाणून घेण्यासाठी १९२२ मध्ये त्यांनी प्रश्नावली तयार करून सर्व संस्थानात प्रसृत केली व लोकांच्याकडून आलेल्या सूचनांचा विचार करून आपले शैक्षणिक धोरण ठरविले. लोकांनीही बाळासाहेबांच्या सुधारणावादी धोरणास पाठिंबा दर्शविला. इतकेच नव्हे तर शेतसाऱ्याच्यावेळीच शिक्षण फंड म्हणून रुपयास एक आणा जास्त देण्याचेही मान्य केले. यावरून बाळासाहेबांच्या कारकिर्दीमध्ये समाजात शिक्षणाबद्दल आवड निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यांच्या कारकिर्दीमध्ये शाळांच्या संख्येत वाढ झालीच. परंतु त्याच बरोबर विद्यार्थ्यांच्या संख्येतही वाढ झालेली दिसून येते. औंध संस्थानच्या शैक्षणिक क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे `मॉडेल क्लास` ही होय. खेडेगावातील शिक्षकास एकट्यालाच तीन-चार वर्ग सांभाळावे लागत होते. हे काम सोयीचे व्हावे यासाठी संस्थानात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी `मॉडेल क्लास` हे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले होते. तीन-चार वर्गांची मुले घेऊन एकाच शिक्षकाने सोयीचे टाईम-टेबल तयार करून कसे शिकवावे याचे प्रशिक्षण या

क्लासमध्ये दिले जात होते. ही पध्दत औंध संस्थानात खूप यशस्वी झाली होती. बाहेरचे शाळाधिकारी औंध संस्थानातून या वर्गांची वेंगपत्रके मागवू लागले होते.[१५]

विद्यार्थ्यांना आपल्या स्वत:च्या पायावर उभे राहता यावे. त्यांनी केवळ नोकरीवरच अवलंबून राहू नये, यासाठी त्यांना धंदेशिक्षण मिळणे आवश्यक आहे, यासाठी बाळासाहेबांनी सन १९३२ मध्ये ` त्रिंबक कलाभवन ` या स्वतंत्र संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत मुलांना ड्राइंग, सुतारकाम, लोहारकाम, विणकाम इत्यादी व्यवसाय शिकण्याची सोय उपलब्ध केली. मुलींच्यासाठीही त्यांनी आपल्या संस्थानात स्वतंत्र शाळा स्थापन केल्या होत्या. संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण वाढावे यासाठी बाळासाहेबांनी प्रौढ शिक्षणाची व्यवस्था केली होती. साक्षरतेचे प्रमाण टिकविण्यासाठी फिरत्या ग्रंथालयाचीही सोय केली होती. त्यामुळेच संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण २० टक्के होते. इतके ते हिंदुस्थानात दुसरीकडे कोठेही नव्हते. याचे श्रेय बाळासाहेबांच्या शिक्षण विषयक धोरणासच द्यावे लागते. इतकेच नव्हे तर औंध संस्थानच्या शिक्षकांचा एक संघ स्थापन करण्यात आला होता. या संघाने ` वर्ल्ड फेडरेशन ऑफ एज्युकेशन असोशिएशन (यु.एस.ए.) ` या जागतिक संस्थेचे १९२९ मध्ये सभासदत्व मिळविले होते. श्री. पंढरीनाथ आत्माराम इनामदार, विद्याधिकारी, औंध यांचा या संस्थेच्या डायरेक्टरांमध्ये समावेश होता. शैक्षणिक प्रगतीच्या बाबतीत छोटया औंध संस्थानने मोठया प्रमाणावर प्रगती केलेली दिसून येते. संस्थानात एकूण ७२ गावे होती त्यापैकी प्रत्येक गावी शाळा होतीच. सन १९३५ मध्ये औंध संस्थानात एकूण ८५ शाळा होत्या. याचे श्रेय बाळासाहेबांच्या पुरोगामी धोरणालाच द्यावे लागते.[१६]

औद्योगिक प्रगती :

बाळासाहेब स्वत: उद्योगप्रिय होते. औंध संस्थानचे औद्योगिकरण करणे हे त्यांचे स्वप्न होते. औद्योगिक प्रगती झाल्याशिवाय संस्थानातील प्रजा, शेतकरी वर्ग सुखी होणार नाही अशी त्यांची खात्री होती. संस्थानमध्ये उद्योगधंद्यांचा विकास झाल्यास लोकांना रोजगार उपलब्ध होईल. शेतीवरील लोकांचा वाढता बोजा कमी होण्यास मदत होईल आणि लोकांची व पर्यायाने संस्थानची आर्थिक सुधारणा होईल असे त्यांचे प्रामाणिक मत होते. आपल्या गरजा परावलंबी असता कामा नयेत. आपल्या राज्यातील कच्चा माल आपला आपणच उपयोगात आणून आपणच त्याचा पक्का माल तयार केला पाहिजे. मजुरी करण्यासाठी संस्थानातील लोकांना संस्थानाबाहेर जाण्याचा प्रसंग येऊ नये. असा त्यांचा विचार होता. यासाठी त्यांनी अनेक लहानमोठे उद्योगधंदे संस्थानात सुरु केले. त्यांच्या सक्रीय मदतीमुळेच १९१० साली औंध संस्थानात लक्ष्मणराव काशिनाथ किर्लोस्कर यांचा कारखाना स्थापन झाला. १९१३ मध्ये याच संस्थानात कराड नजिक ओगलेबंधूंनी आपला काच कारखाना सुरु केला. १९३० मध्ये आण्णासाहेब (बाळासाहेबांचे पुतणे) यांना त्यांनी प्रोत्साहन देऊन ओगलेवाडी येथे औंध सोफ वर्क्स हा साबणाचा कारखाना सुरु करावयास लावला. त्यांच्या सक्रीय मदतीमुळेच औंध संस्थानात अनेक लहान मोठया उद्योगधंदाचा उदय व विकास घडून आल्याचे दिसते.[१७]

स्वढेच नव्हे तर बाळासाहेबांनी लोकांना धंदे-शिक्षण मिळावे यासाठी `त्रिंबक कलाभवन` या स्वतंत्र संस्थेची स्थापना केली होती. याचा पाठीमागे उल्लेख आलेला आहेच. या संस्थेमधून धंदेशिक्षण घेऊन अनेकांनी आपले स्वतंत्र व्यवसाय सुरु केले. संस्थानातील औंध, आटपाडी, कुंडल, गुणदाळ या सर्वच तालुक्यात लहानमोठया प्रमाणावर हातमागाचा धंदा सुरु होता. या धंदाला बाळासाहेबांनीच प्रोत्साहन दिले होते. या पाठीमागे त्यांची सुधारणावादी दृष्टी होती असे आपणास दिसून येते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

स्वदेशी :

बाळासाहेब प्रतिनिधी हे स्वदेशीचे कट्टर पुरस्कर्ते होते. बाळासाहेब स्वत: आपल्या संस्थानात हातमागावर तयार होणारा जाडाभरडा कपडा वापरीत होते. त्याचप्रमाणे राजघराण्यातील इतर व्यक्तींना देखील संस्थानातील हातमागावर तयार केलेले कापड वापरावे लागत होते. एवढेच नव्हे तर बाळासाहेबांनी आपले चिरंजीव माधवराव व नातू भगवंतराव यांच्या मुंजीचेवेळी लागणारे सर्व कपडे संस्थानातील विणकरांकडून तयार करवून घेतले होते. `कच्चा देऊ नये, पक्का घेऊ नये. कच्चा घ्यावा, व पक्का घ्यावा` ही बाळासाहेबांची चतुसूत्री होती. त्यांच्या वक्तव्यातून त्यांची स्वदेशी वस्तूबद्दलची तळमळ दिसून येते.

किर्तनकार :

बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे उत्कृष्ट किर्तनकार होते. किर्तन हा विषय त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा होता. प्रत्येक वर्षी शिवजयंती व वडील कै. श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी यांची पुण्यतिथी भाद्रपद शुक्ल १४ या दोन प्रसंगांची किर्तने ते स्वत: करीत असत. गादीवर आलेपासून त्यांचा हा क्रम सुरू होता. किर्तन हे समाजप्रबोधनाचे एक प्रभावी साधन आहे याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे आपल्या किर्तनातील प्रत्येक शब्द ऐकणाऱ्याच्या अंत:करणापर्यन्त जाऊन कसा पोहचेल याबद्दल ते फारच दक्ष होते. यासाठी लागणारे प्रभावी वक्तृत्व त्यांच्याजवळ होते. त्यांचे किर्तन ते स्वत:च लिहीत असत. किर्तनाचे विषय सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक असे असत. सहकार, कर्तव्यनिष्ठा, स्वार्थत्याग, लोकसेवा, अस्पृश्योध्दार या विषयावर किर्तने केली जात असत. त्यामुळे मनुष्याच्या अंत:करणात राष्ट्रभावना वाढीस लागावी, मनात सुविचार उत्पन्न व्हावेत व एकंदरीत त्याचे वैयक्तिक व सामाजिक जीवन उच्च दर्जाचे व सुखकर व्हावे हाच बाळासाहेब पंतप्रतिनिधींचा या पाठीमागील उद्देश होता. त्यांच्या किर्तनाची पुस्तकेही छापून प्रसिध्द झालेली होती.

9603
A

चित्रकला :

बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे जसे उत्तम प्रतीचे किर्तनकार होते, तसेच ते उत्कृष्ट चित्रकारही होते. या विषयाची त्यांना लहानपणापासूनच आवड होती. या विषयाची त्यांना केवळ आवडच नव्हती तर यथार्थ असे ज्ञान होते. त्यांची अनेक चित्रे लोकप्रिय व सर्वोत्कृष्ट होती. त्यांच्या चित्रांचे विषय पौराणिक व ऐतिहासिक असे असत. चित्रकलेच्या बाबतीत त्यांनी कोणत्याही पध्दतीचे अंधानुकरण केलेले दिसत नाही. चित्रकलेबाबत त्यांची स्वत:ची अशी स्वतंत्र पध्दत होती. त्याला आपणास ` औंध स्कूल ऑफ आर्ट ` असेही म्हणता येईल. बाळासाहेब पंतप्रतिनिधींचा स्वतंत्र चित्रसंग्रह होता. या संग्रहातील जुन्या-नव्या शेकडो चित्रकारांची चित्रे त्यांनी लक्षावधी रुपये खर्च करून जमविली होती. त्याचप्रमाणे चित्रकलेवरील जेवढे म्हणून ग्रंथ प्रसिध्द झालेले होते, त्यापैकी अनेक ग्रंथ बाळासाहेबांच्या संग्रही होते.[१८] यावरून त्या विषयाची त्यांना मनापासून आवड होती असे दिसून येते.

बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी अनेक चित्रकारांना उदार आश्रय दिला होता. ते स्वत: उच्च प्रतीचे चित्रकार होते. त्यांनी काढलेल्या चित्रांपैकी काही चित्रे आजही आपणास औंध येथील श्री यमाई देवीच्या सभा मंडपात लावलेली पहावयास मिळतात. त्यावरून आपणास त्यांच्या चित्रकलेविषयीच्या ज्ञानाची कल्पना येऊ शकते. ते जसे उच्च प्रतीचे चित्रकार होते तसेच ते उत्तम चित्रकला टीकाकारही होते. त्यांचा हा गुण त्यांच्या चित्रकलेवरील ` अजिंठा ` व ` वेरुळ ` या ह दोन पुस्तकावरून दिसून येतो. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यास या युनिव्हर्सिटीची चित्रकला शाखा औंध येथे निघावी अशी बाळासाहेबांची इच्छा होती. त्यासाठी ते आपला चित्रसंग्रह व पुस्तक संग्रह त्या विद्यापीठास देण्यास तयार होते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## साहित्य :

साहित्य निर्मितीच्या बाबतीत बाळासाहेबांनी महत्वाची कामगिरी बजावली होती. साहित्याच्या माध्यमातून लोकांची करमणूक होते. त्याचप्रमाणे लोकजागृतीचे साधन म्हणूनही साहित्य महत्वाचे आहे, हे जाणून बाळासाहेबांनी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकरांना सक्रिय सहकार्य देऊन ` स्वाध्याय मंडळ, औंध ` या संस्थेची स्थापना केलेली होती, याचा उल्लेख पाठीमागे आलेला आहेच. या मंडळातर्फे ग्रंथनिर्मिती करुन त्यांनी साहित्यामध्ये मोठीच भर घातलेली दिसून येते. त्याचप्रमाणे स्वत: बाळासाहेबांनी आहारशास्त्र, व्यायाम-शास्त्र, नेत्रबल संवर्धन इत्यादींचा शास्त्रीय अभ्यास करुन त्यावर त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. ते ग्रंथ प्रमाणभूत मानले जातात. त्याचप्रमाणे अनेक विषयावर त्यांनी उत्कृष्ट, प्रभावी असे लेख लिहिले त्यापैकी काही निवडक लेख वाग्भट नारायणराव देशपांडे यांनी ` स्फुट लेख संग्रह ` या शीर्षकाखाली १९३५ मध्ये प्रकाशित केले आहेत. त्यातील ` हा बौध्दिक शक्तिपात थांबविलाच पाहिजे ` हा लेख अत्यंत उद्बोधक असा आहे. त्यातील काही भाग येथे देत आहे आणि ते अयोग्य ठरु नये.

`....तरुणातील वाढत्या आत्महत्येची संख्या पाहिली म्हणजे त्यांच्या दुबळ्या मनोधैर्याची आणि संकुचित दृष्टीकोनाची कीव वाटल्यावाचून राहात नाही. तरुण पिढी ही राष्ट्राचा आधार. राष्ट्राची सर्वांगिण प्रगती खरे पाहिले तर तिच्यावर अवलंबून आणि ती तरी अशी नोकरी मागे लागून शारिरिक आणि मानसिक दृष्टीने हताश भंगल्ल आणि निराश झालेली. जणू काय दुसऱ्याचे जोडे पुसणे हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय.....खऱ्या खलाशाला जितका दर्या खवळलेला असेल तितकी त्यांतून नाव हाकतांना मौज वाटते तशी यालाहि वाटली पाहिजे.....कॉलेजात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला १५ रुपये (त्यावेळचे) दरमहाची नोकरी नाही मिळाली तर तितकाच पैसा

देणारे हजामाचे किंवा चांभाराचे दुकान उघडण्यास काय हरकत आहे..... कोणताही व्यवसाय चांगला अगर वाईट नाही. त्याचा चांगुलपणा, वाईट-पणा तो करणाऱ्यावर अवलंबून आहे....."[१९] यावरून बाळासाहेबांचा स्पष्टवक्तेपणा व प्रजाहिताची त्यांना असणारी तळमळ दिसून येते.

सारांश, बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे विसाव्या शतकातील औंधचे राज्यकर्ते विद्या, कला, सेवा आणि त्याग या सर्वच बाबतीत तत्कालीन हिंदुस्थानातील इतर राज्यकर्त्यांपेक्षा उच्च होते. याशिवाय त्यांनी आपल्या छोट्याशा संस्थानात यशस्वी लोकतंत्र राबविण्याचा प्रयोग करून दाखविला. तो अत्यंत कौतुकास्पद आणि तत्कालिन संस्थानिकांत अद्वितीय असाच होता. बाळासाहेब पंतप्रतिनिधींची कारकिर्द औंध संस्थानच्या इतिहासात संस्मरणीय अशीच आहे.

बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे दुसरे चिरंजीव बॅरिस्टर आप्पासाहेब ही विसाव्या शतकातील औंध संस्थानमधील एक उल्लेखनीय व्यक्ती होय. आप्पासाहेब हे आपल्या वडिलांप्रमाणेच उच्च विद्याविभूषीत आहेत. आप्पासाहेबांचे व्यक्तीमत्व त्यांच्या तारूण्यात अत्यंत प्रभावी होते. समोरच्या व्यक्तीवर त्यांच्या व्यक्तीमत्वाची चटकन् छाप पडत असे. आपल्या या व्यक्तीमत्वाची आप्पासाहेबांना जाणीव होती. बाळासाहेब पंतप्रतिनिधी आणि त्यांचे चिरंजीव आप्पासाहेब यांच्या व्यक्तीमत्वाची तुलना केल्यास आप्पासाहेबांचे व्यक्तीमत्व बाळासाहेबांच्या व्यक्तीमत्वापेक्षा प्रभावी होते. असे आपणास दिसून येते. बॅरिस्टर आप्पासाहेब पंत यांचा दृष्टीकोण विशाल आणि वृत्ती पुरोगामी होती. त्यांच्या व्यक्तीमत्वात समाजवादी विचार प्रबळ होते. पुरोगामी धोरणे, विशाल दृष्टीकोण व प्रभावी व्यक्तीमत्व यामुळे ते आपल्या संस्थानच्या प्रजेमध्ये अत्यंत प्रिय होते. सन १९३७ मध्ये बॅरिस्टर होऊन इंग्लंडहून ते परत आल्यानंतर अवघ्या दीड-दोन वर्षात औंधमध्ये जी सत्तांतराची क्रांती घडून आली

त्यामध्ये आप्पासाहेबांचा सिंहाचा वाटा होता. देशातील राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रमुख नेत्यांशी विशेषत: म. गांधी व पं. जवाहरलाल नेहरू यांच्याशी त्यांचे निकटचे संबंध होते. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची हिंदी संस्थानांबद्दलची व संस्थानी प्रजेच्या चळवळी बाबतची धोरणे काय आहेत याची त्यांना चांगली जाण होती. आप्पासाहेबांनीच काळाची पाऊले ओळखून, बदलत्या परिस्थितीचे भान ठेऊन सर्व सत्ता संस्थानातील प्रजाजनांच्या हाती सुपूर्द करावयास बाळासाहेबांना प्रवृत्त केले व १९३९ चा औंध राज्यघटनेचा कायदा अंमलात आणला. बाळासाहेबांनीही अधिकार त्याग करून सर्व सत्ता औंध संस्थानातील प्रजेच्या हाती सुपूर्द केली. सन १९३९ नंतर ते फक्त लोकांचे विश्वस्त म्हणून काम पाहू लागले.

औंध संस्थानात स्वराज्याच्या राज्यघटनेचा कायदा अंमलात येऊन लोकनियुक्त मंत्रीमंडळ सत्तेवर आले. बॅ. आप्पासाहेब या लोकनियुक्त मंत्रीमंडळाचे पहिले अध्यक्ष बनले. लोकनियुक्त मंत्रीमंडळाच्या राजवटीच्या सुमारे आठ वर्षांच्या काळात औंध संस्थानचा कारभार व धोरण यांच्यावर प्रामुख्याने आप्पासाहेबांचीच छाप होती.

देशाला स्वातंत्र्य प्राप्ती झाल्यानंतर अल्पावधीत संस्थानांचे विलीनीकरण झाले. पंतप्रतिनिधींचे औंध संस्थानही इतिहासजमा झाले. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या राज्यकर्त्यांनी बॅ. आप्पासाहेब पंत यांची भारताचे राजदूत म्हणून विविध देशांत नेमणूक केली. त्यांनी या पदावर सुमारे पाव शतकापेक्षा जास्त काळ कुशलतेने काम केले. आजही जनमानसात औंध संस्थानातील लोकशाहीचा प्रयोग म्हणजे बॅ. आप्पासाहेब पंत असेच समीकरण स्थिरावलेले आढळते.

## संदर्भ व तळटीपा


१) पंत भवानराव, आत्मचरित्र, खंड १, पृ. ३१०.

२) कित्ता, पृ. ३११.

३) गौरव ग्रंथ मंडळ, औंध, श्री भवानराव गौरव ग्रंथ, भाग-२, विभाग १, पृ. १०२-३.

४) आठल्ये वा.वि., आत्मवृत्त, पृ. १५९.

५) गौरव ग्रंथ, उपरोक्त, श्री. कुलकर्णी द.ग. यांचा लेख (शब्दचित्र) पहा पृ. १, गौरव ग्रंथ मंडळ, औंध, श्री भवानराव गौरव ग्रंथ, भाग-१, विभाग ४, पृ. ३१६.

६) पंत आप्पा, मुलखा वेगळा राजा, पृ. १-३.

७) गौरव ग्रंथ, भाग-२,उपरोक्त, विभाग १, पृ. १२८.

८) पंत आप्पा, उपरोक्त, पृ. १-२.

९) कित्ता, पृ. २.

१०) गौरव ग्रंथ, उपरोक्त, भाग-१, विभाग ४, पृ. २२२.

११) कित्ता, पृ. ३१७-४८, पंत आप्पा, उपरोक्त, पृ. २.

१२) चित्राव सिध्देश्वर शास्त्री (सं.), भारतवर्षीय अर्वाचीन चरित्र कोष, पृ. ९२ .

१३) गौरव ग्रंथ, उपरोक्त, भाग २, विभाग ४, पृ. ८७-८९.

१४) रोदरमुंड इंदिरा, दि औंध एक्सप्रिमेंट ए गांधीयन ग्रासरूटस् डोमॅक्रसी, पृ. २४-२६.

१५) कित्ता, पृ. २४-२५, गौरव ग्रंथ, उपरोक्त, भाग २, विभाग ४, पृ.१८.

१६) रोदरमुंड इंदिरा, उपरोक्त, पृ. २६, गौरव ग्रंथ, उपरोक्त, भाग २, विभाग ४, पृ. १२१.

१७) *औंध संस्थान प्रशासन अहवाल*, वर्ष १९०९-१०, रोदरमुंड इंदिरा, उपरोक्त, पृ. ३३, गौरव ग्रंथ, उपरोक्त, भाग २, विभाग ४, पृ. ६६-७८-८४.

१८) चित्राव सिद्धेश्वरशास्त्री, उपरोक्त, पृ. ९२.

१९) देशपांडे वाग्भट नारायण (सं.), *स्फुट लेख संग्रह*, पृ. ७८-८०.